## " नव्या शिक्षण पध्दतीचा अवलंब हीच डॉ. बापूजी साळुंखे यांच्या शैक्षणिक कार्याला आदरांजली "

**मा. रमेश पानसे , ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, पुणे**

कोल्हापूर दि.8 : " शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांनी आपल्या शैक्षणिक कार्यातून खेडयापाडयातील गोरगरीबांच्या मुलांना शिक्षण देण्याचे महान कार्य केलेले आहे . बापूजींच्या कार्यात आजचे शिक्षण व उद्याचा जीवन विकास असा परस्पर संबंध होता. ज्ञानदानासाठी शाळा काढताना मुलांमध्ये शाळेची गोडी निर्माण केली पाहिजे. शाळेची दारे लावता येतात पण मुलांच्या मनाची दारे खुली करण्यासाठी मुलांना शाळेत आणले पाहिजे. हाच विचार डॉ. बापूजींच्या शैक्षणिक कार्यातून दिसून येतो. आज नव्या शिक्षण पध्दतीचा अवलंब करणे गरजेचे आहे. हीच त्यांच्या कार्याला आदरांजली ठरेल. " असे विचार शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३१ व्या स्मृतिदिन समारंभात मा.श्री. रमेश पानसे , ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ यांनी ' **आजचे शिक्षण उद्याचे जीवन** ' या विषयावर बोलताना काढले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.

आपल्या भाषणातून मा.रमेश पानसे पुढे म्हणाले की, येत्या वीस वर्षात नविन ~~अमल्यासमोर~~ 70% व्यवसाय निर्माण झाले परंतु व्यवसायाभिमुख शिक्षणपध्दतीचा अवलंब न झाल्याने बेकारीचे प्रमाण वाढले. आजच्या मुलांना काय द्यायचे की जेणेकरुन ही मुले आपल्या पायावर उभी राहतील आणि शिक्षण घेऊन स्वतःचा व समाजाचा विकास साधतील. यासाठी शाळा हे आनंदवनाचे ठिकाण झाले पाहिजे. बापूजींनी सांगितलेल्या गुरुदेव संकल्पनेमध्ये गुरुत्व आणि दैवत्व या दोन्ही गोष्टी दिसून येतात. याचाच अंगिकार करुन आज नव्या शिक्षण व्यवस्थेला आपण सामोरे गेले पाहिजे.

आपल्या अध्यक्षीय भाषणात संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांच्या कार्याची ओळख करुन देताना कोणताही भेदाभेद न करता शिक्षणातून समाजपरिवर्तन घडविले पाहिजे. या उद्देशाने त्यांनी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची उभारणी करुन गोरगरिबांच्या मुलांना ज्ञानाची कवाडे खुली करुन दिली. ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार या त्यांच्या शैक्षणिक तत्वप्रणालीतून फार मोठा शिक्षण विचार समाजासमोर उभा आहे. बापूजींच्या कार्याचे स्मरण , चिंतन आजच्या समाजाने करणे आवश्यक आहे.

सुरुवातीला प्रमुख पाहुण्यांनी व संस्था पदाधिकारी यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व संस्थामाता श्रीमती सुशीलादेवी साळुंखे यांच्या समाधीचे दर्शन घेऊन पुष्पचक्र अर्पण केले. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन व संस्थेच्या प्रार्थनागीताने करण्यात आली. यावेळी श्री महेश हिरेमठ व त्यांच्या साथीदारांनी भावपूर्ण भक्तिगीते व भावगीते सादर करुन सर्वांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ युवराज भोसले यांनी केले. पाहुण्यांची ओळख संस्थेचे सहसचिव ( अर्थ) मा. प्राचार्य डॉ आर.व्ही.शेजवळ यांनी करुन दिली. संस्थेच्या सचिव मा. प्राचार्या सौ.शुभांगी गावडे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा.समिक्षा फराकटे यानी केले.

यावेळी पाहुण्यांच्या हस्ते संस्थेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करणेत आला.तसेच याप्रसंगी बापूजींचे जीवन व कार्य, वार्षिक नियोजन पुस्तिका व संस्थेची निकाल संकलन पुस्तिका इत्यादी पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी न्यू मॉडेल हायस्कूल, कोरेगावचा विद्यार्थी कु. शार्दुल सोनावणे याने बापूजींच्या व्यक्ती व कार्या विषयी भाषण केले.

या प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष मा. नामदेवराव कांबळे, प्रा.पी यु शेठ, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस.वाय. होनगेकर, शाहिर कुंतीनाथ करके, डॉ. शरदचंद्र साळुंखे तसेच संस्था पदाधिकारी, विविध शाखांचे प्राचार्य, मुख्याध्यापक, गुरुदेव कार्यकर्ते व विद्यार्थी , विद्यार्थिनीं बहुसंख्येने उपस्थित होते.

---

### विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

जा.क्र.व्हीसीके/ 1516 /2018-19 — दिनांक : 08.08.2018

प्रति,

मा. संपादकसो,

दैनिक ------------------------- कोल्हापूर .

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात फोटोसह प्रसिध्द करुन सहकार्य करावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू ,

(डॉ. एस. वाय. होनगेकर )

प्राचार्य

विवेकानंद कॉलेज

कोल्हापूर

o/c